१

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
गुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/आंबेडकरनगर/१४८२/२०१७
दिनांक : २४/११ /२०१७

## "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे. ओम साई कन्स्ट्रक्शन यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल झालेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी प्राथमिक सर्व्हेक्षणाचे जाहिर प्रकटन केलेले प्राथमिक सर्व्हे झालेला असून एकूण झोपडयांची संख्या अंदाजे १२०-१२५ आहे.

ज्याअर्थी, विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे एकूण क्षेत्र २२३७.१० चौ.मी. असून त्यापैकी १६२६.५६ चौमी इतके क्षेत्रफळ महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.११/०४/१९९१ नुसार घोषित आहे. सबब राजपत्रामध्ये सदरचे क्षेत्र घोषित असल्याने सदरचे क्षेत्र दि.१६/१०/२०१७ रोजीचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (३क) मध्ये समाविष्ट करणेत आलेले नाही. सबब ज्यावेळी ३१/०४/१९९१ च्या राजपत्रातील विवरणपत्राची पडताळणी करता सदरचे प्रसिध्द झालेले राजपत्र हे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम-४(१) अन्वये महानगरपालिका पिंपरी चिंचवड क्षेत्राकडून प्रसिध्द झालेले असल्याचे निर्दशनास आले. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून झोपडपट्टी पुनर्वसन आदेश १६२६.५६ चौ.मी. क्षेत्र जे पूर्वीच घोषित आहे. पण वेगळया कलमखाली व उद्देशासाठी असल्याने ते क्षेत्र सुध्दा झोपडपट्टी



Scanned with CamScanner

पुनर्वसन क्षेत्र म्हणून ३क खाली घोषित करणे आवश्यक असल्याने तसा आदेश करणे उचित आहे.

त्याअर्थी मी पांडूरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये खालील अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार (४) आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

<u>अनुसूची</u>

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| स.नं.१०३ मधील सि.स.नं.६४२६ पै, ६४२७, ६४२८, ६४२९पै, ६४६२, ६४६२/१, पिंपरी, आंबेडकर, नेहरुनगर, पुणे | १) यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन आदेश केलेले क्षेत्र-६१०.६१ चौ.मी.<br>२) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून या आदेशाव्दारे घोषीत करावयाचे उर्वरीत क्षेत्र-१६२६.५६ चौ.मी.<br>३) एकूण क्षेत्र-२२३७.१० चौ.मी. | **पुर्वेस** - सि.स.नं.६४२५<br>**पश्चिमेस** - सि.स.नं.६४२९, ६४३०<br>**उत्तरेस** - सि.स.नं.६४०३<br>**दक्षिणेस** - सि.स.नं.६४६२ |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

**पांडूरंग पोले** भा.प्र.से.
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक - २४/११/२०१८

Scanned with CamScanner